आदेश क्र.५२४/२०२१

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग

हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email : tahasildargadraigad@gmail.com

(सामान्य शाखा) क्र.साशा/ब-५/आ.व्य.प्रा./प्रति.उपा.कोव्हीड-१९/२०२१ दि.१८/०५/२०२१

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि.१३/०४/२०२१

२) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.गृह/एमएजी-१/प्रति.उपा.कोव्हीड-१९/सीआरपीसी १४४/२०२१ दि.१४/०४/२०२१ (करोना आदेश क्र.४७७/२०२१)

३) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि.२०/०४/२०२१

४) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.गृह/एमएजी-१/प्रति.उपा.कोव्हीड-१९/सीआरपीसी १४४/२०२१ दि.२०/०४/२०२१ (करोना आदेश क्र.४९०/२०२१)

५) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि.२१/०४/२०२१

६) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.गृह/एमएजी-१/प्रति.उपा.कोव्हीड-१९/सीआरपीसी १४४/२०२१ दि.२२/०४/२०२१ (करोना आदेश क्र.४९५/२०२१)

७) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि.२९/०४/२०२१

८) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.गृह/एमएजी-१/प्रति.उपा.कोव्हीड-१९/सीआरपीसी १४४/२०२१ दि.३०/०४/२०२१ (करोना आदेश क्र.५०९/२०२१)

९) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि.१२/०५/२०२१

१०) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.गृह/एमएजी-१/प्रति.उपा.कोव्हीड-१९/सीआरपीसी १४४/२०२१ दि.१४/०५/२०२१ (करोना आदेश क्र.५२०/२०२१)

११) शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील पत्र क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीएम-१, दि.१८/०५/२०२१

१२) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.१८/०५/२०२१.

---

## - अधिसूचना -

ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.१ व ३ कडील आदेशान्वये "ब्रेक दी चेन (Break the Chain)" अंतर्गत लागु केलेल्या सुधारीत प्रतिबंधात्मक उपाययोजनाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून उपोद्घातातील अ.क्र.२ व ४ कडील आधिसुचनांन्वये रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात अनुक्रमे दि.१४/०४/२०२१ रोजीचे रात्री ८.०० वाजले पासून दि.०१/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत व दि.२२/०४/२०२१ रोजीचे रात्री ८.०० वाजले पासून

दि.०१/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत कोव्हीड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, त्यामध्ये नमूद प्रतिबंधीत कृत्ये करण्यास मनाई असल्याचे आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागा कडील उपोद्घातातील अ.क्र.७ कडील आदेशान्वये यापुर्वी "ब्रेक दी चेन (Break the Chain)" अंतर्गत उपोद्घातातील अ.क्र.१ व ३ कडील आदेशान्वये लागू केले निर्बंध त्यात करण्यात आलेल्या सुधारणांसह दि.१५/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत लागू करण्यात आले असल्याने, या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.२ व ४ कडील आधिसुचनांन्वये कोव्हिड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी करण्यात आलेले मनाई आदेश, त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणेसह या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.८ कडील अधिसूचनेद्वारे दि.१५/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत लागू करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागा कडील उपोद्घातातील अ.क्र.९ कडील आदेशान्वये या पुर्वी "ब्रेक दी चेन (Break the Chain)" अंतर्गत उपोद्घातातील अ.क्र.१, ३ व ७ कडील आदेशान्वये लागू केलेले निर्बंध त्यात करण्यात आलेल्या सुधारणांसह तसेच उक्त आदेशात नमूद अधिकच्या निर्बंधांसह व स्पष्टीकरणासह दि.०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वा. पर्यंत लागू करण्यात आलेले असून, या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.२, ४ व ८ कडील आधिसुचनांद्वारे कोव्हिड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणेसह तसेच उपोद्घातातील अ.क्र.९ कडील आदेशात नव्याने नमूद अधिकच्या निर्बंधांसह व स्पष्टीकरणासह या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.१० कडील अधिसूचनेद्वारे दि.०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत लागू करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागा कडील उपोद्घातातील अ.क्र.३ कडील आदेश व अनुषंगाने या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.४ कडील अधिसूचनेद्वारे "सर्व किरणा, भाजीची दुकाने, फळ विक्रेते, दुध डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्यपदार्थ दुकाने (चिकन, मटण, पोल्ट्री, मच्छी व अंडी त्यात समावेश), कृषी अवजारे व शेतातील उत्पादनांशी संबंधित दुकाने, पाळीव प्राणांच्या खाद्यपदार्थांची दुकाने, व्यक्तींसाठी तसेच आस्थापनांसाठी पावसाळापुर्वी करण्यात येणाऱ्या कामाकरीता लागणारी साधनसामुग्री संबंधित दुकाने फक्त सकाळी ७.०० ते सकाळी ११.०० वाजे पर्यंत चालू राहतील", असे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. तथापि, जिल्ह्यात दि.१७/०५/२०२१ रोजी आलेल्या " ताऊते " चक्रीवादळामुळे घर, वाडे, गोठे इ. मोठ्याप्रमाणात झालेल्या नुकसानाच्या व अनुषंगाने उद्भवलेली आपत्तीजन्य स्थिती विचारात घेता, नागरिकांना त्यांच्या नुकसानग्रस्त घर, वाडे, गोठे इ. वास्तुंची तात्काळ स्वरुपात दुरुस्ती/पुर्नबांधणी करणे आवश्यक आहे. शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.११ कडील पत्रान्वये चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त झालेली घर, वाडे इ. वास्तुंची तात्काळ स्वरुपात दुरुस्ती/पुर्नबांधणी करण्याकरीता आवश्यक आस्थापना अधिकच्या कालावधीत सुरु ठेवण्याबाबतचा निर्णय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी घ्यावा, असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार उपोद्घातातील अ.क्र.४ कडील अधिसूचनेद्वारे निर्बंधीत केलेल्या आस्थापना / दुकानांपैकी काही आस्थापना / दुकाने यांना निर्बंधातून वगळून नियमितपणे पुर्ण वेळ सुरु ठेवण्यास मान्यता देणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी मी, निधी चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड मला साथरोग अधिनियम, १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोव्हीड - १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.४ कडील अधिसूचनेद्वारे निर्बंधीत केलेल्या **आस्थापना / दुकानांपैकी किराणा, भाजीची**

दुकाने, फळ विक्रेते, चिकन/ मटण/मासळी विक्रेते, रास्तभाव धान्य दुकाने, फॅब्रिकेशन कामे करणाऱ्या आस्थापना, दुध डेअरी, अवजारे व शेतातील उत्पादनांशी संबंधित दुकाने, पावसाळा पुर्वी करण्यात येणाऱ्या कामाकरीता लागणारी साधनसामुग्री उदा. सिमेंट, पत्रे, ताडपत्री, विद्युत उपकरणे, हार्डवेअर सामान विक्री करणारी दुकाने यांना निर्बंधातून वगळून पुढील आदेश होईपर्यंत नियमितपणे पूर्ण वेळ सुरु ठेवण्यास तसेच मजूरांच्या सहाय्याने दुरुस्तीची / पुर्नबांधणीची कामे करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ सह अन्य तरतूदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.१०/०५/२०२१ रोजी दिलेला आहे.

सही/-XXX
(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत :- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर
प्रत :- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप, अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांजकडे आवश्यक त्या उचित प्रसिध्दीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय पोलीस अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- पोलीस निरिक्षक, (सर्व) पोलीस ठाणे यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्याधिकारी नगर पालिका / नगर पंचायत (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग